**ठळक बातम्या**

- दहशतवादाविरोधातल्या लढ्यात देशातली एकी हीच सर्वात मोठी ताकद असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन
- जगात इतरत्र संकटकाळात भारतातर्फे करण्यात येणाऱ्या मदतीची दिली माहिती.

- महाराष्ट्रात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांपैकी कुणीही बेपत्ता नसून या सर्व नागरिकांना देशाबाहेर काढायची प्रक्रिया सुरू असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

**आणि**

- आयपीएल टी-20 क्रिकेटमध्ये, मुंबईच्या वानखेडे मैदानावर आज मुंबई इंडियन्सची गाठ लखनौ सुपर जायंट्स संघाबरोबर पडणार

<><><><<>

दहशतवादाविरोधातल्या लढ्यात १४० कोटी भारतीयांची एकजूट हीच सर्वात मोठी ताकद असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' या कार्यक्रमात केलं. हा या कार्यक्रमाचा एकशे एकविसावा भाग होता. प्रधानमंत्र्यांनी पहलगाम इथं पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याच्या घटनेनं व्यथित झाल्याचं सांगितलं. या हल्ल्यातल्या पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देण्याचं आश्वासन आणि दोषींना कठोर प्रत्युत्तर देण्याचा निर्धार त्यांनी आजच्या मन की बात मधून व्यक्त केला. या आव्हानाचा सामना करण्यासाठी एक राष्ट्र म्हणून प्रबळ इच्छाशक्ती दाखवून द्यावी लागेल, असं ते म्हणाले. जगभरातल्या देशांच्या नेत्यांनी या कठीण काळात भारताला पाठिंबा सोबत दिल्याचंही त्यांनी नमूद केलं.

ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. के. कस्तुरीरंगन यांचं नुकतंच निधन झाल्याचा उल्लेख करुन प्रधानमंत्र्यांनी विज्ञान, शिक्षण आणि भारताच्या अंतराळ क्षेत्रातल्या त्यांच्या

कार्याला उजाळा दिला. त्यांच्यामुळेच इस्रोला नवी ओळख आणि भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला जागतिक मान्यता मिळाल्याचं मोदी म्हणाले. यानिमित्तानं प्रधानमंत्र्यांनी इसरोची कामगिरीही श्रोत्यांसमोर मांडली. एप्रिल महिन्यात आर्यभट्ट उपग्रहाच्या प्रक्षेपणाला ५० वर्षं पूर्ण झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. ५० वर्षांपूर्वी मर्यादित संसाधनं असूनही भारतीय शास्त्रज्ञांनी आपली प्रतिभा, समर्पण वृत्ती आणि राष्ट्रसेवेच्या भावनेतून या क्षेत्रातली भारताची आजवरची वाटचाल घडवून आणली असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. आज भारत सर्वात किफायतशीर आणि यशस्वी अंतराळ कार्यक्रमांच नेतृत्व करत आहे, आणि जगभरातले अनेक देश त्यांच्या अंतराळ मोहिमांसाठी भारताची मदत घेत असल्याचं त्यांनी सांगितलं. आज देशात सव्वा तीनशेहून अधिक अंतराळविषयक स्टार्टअप्स कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली.

भारतातर्फे इतर देशांमधे केल्या जात असलेल्या मानवतावादी मदतीची आणि मानवतेप्रती भारताची वचनबद्धताही प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केली. अलिकडेच म्यानमारमध्ये झालेल्या भीषण भूकंपानंतर भारतानं ऑपरेशन ब्रह्मा अंतर्गत म्यानमारमध्ये केलेल्या मदत आणि बचाव कार्याची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. भारतीय बचाव पथकामुळे अनेकांना नवं जीवन मिळाल्याबद्दल तिथल्या लोकांनी व्यक्त केलेली कृतज्ञताही प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांपर्यंत पोहचवली. अफगाणिस्तान तसंच युथोपियामधे भारताच्या वतीनं केल्या जात असलेल्या वैद्यकीय मदतीची महिती प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली.

**बाईट - MKB- MODI VISHWAMITRA - 17**

या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं तयार केलेल्या सचेत या मोबाईल ॲपविषयी देखील माहिती दिली. या ॲपच्या माध्यमातून पूर, चक्रीवादळ, भूस्खलन, त्सूनामी, वणवे, हिमस्खलन, वादळ, वीज

कोसळणं या आणि अशा नैसर्गिक आपत्तींविषयीची माहिती उपलब्ध होईल तसंच संकटाच्या काळात सुरक्षित राहायलाही मदत होईल असं त्यांनी सांगितलं. श्रोत्यांनी या ॲपचा वापर करावा असं आवाहनही त्यांनी केलं.

भारताचा युवा वर्ग विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाकडे वाटचाल करत असल्याची उदाहरणं त्यांनी दिली. यासोबतच देशाच्या विविध भागातल्या प्रयोगशील शेतकऱ्यांनी प्रतिकूल हवामानात विविध पिकं घेण्यासंबंधी केलेल्या प्रयोगांची माहिती त्यांनी दिली.

१०८ वर्षांपूर्वी १८५७ च्या एप्रिल आणि मे महिन्यात झालेल्या पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाचं स्मरण त्यांनी श्रोत्यांना करून दिलं. यानिमित्तानं महात्मा गांधी यांच्या नेतृत्वात चंपारण इथं झालेल्या सत्याग्रहाची आणि या सत्याग्रहातूनच भारताचे पहिले राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांचा उदय झाल्याची गाथा त्यांनी श्रोत्यांना सांगितली. येत्या १० मे ला या पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाच्या स्मृती दिनानिमित्त आपण स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रेरणा जिवंत ठेवाव्यात असं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

एक पेड मां के नाम या वृक्ष लागवड मोहिमेला येत्या ५ जूनला एक वर्ष पूर्ण होणार असल्याचं सांगून मोदी यांनी आवाहन केलं, की देशातल्या नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावं.

**<><><><<>**

जम्मू - काश्मीरमध्ये मंत्रिमंडळाच्या विनंतीवरून, नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर चर्चा करण्यासाठी उद्या विधानसभेचं एक दिवसाचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे. दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना विधानसभेत श्रद्धांजली वाहण्यात येईल, त्यानंतर या घटनेवर आणि संबंधित मुद्द्यांवर चर्चा होईल, आणि या घटनेचा तीव्र निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात येईल.

**<><><><<>**

देशातल्या सर्व दूरचित्रवाहिन्या, वृत्तसंस्था आणि समाज माध्यम वापरकर्ते यांनी राष्ट्रीय सुरक्षिततेच्या हितासाठी सावधगिरी बाळगण्याचे आणि विद्यमान कायदे आणि नियमांचं काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं दिले आहेत. या संदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेत संरक्षणविषयक कारवाईशी संबंधित, कोणत्याही प्रकारचं प्रत्यक्ष दृश्य प्रसारण किंवा स्रोत आधारित माहिती प्रसारित केली जाऊ नये असं स्पष्टपणे सांगितलं आहे. संवेदनशील माहिती उघड केल्याचा शत्रूला फायदा होऊन आपल्या संरक्षण दलांची कार्यक्षमता आणि सुरक्षितता धोक्यात येऊ शकते. करगिल युद्ध, मुंबई दहशतवादी हल्ला आणि कंधार अपहरणाच्या घटनांची आठवण यासंदर्भात करून देण्यात आली आहे.

**<><><><<>**

महाराष्ट्रात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांपैकी कुणीही बेपत्ता नसून या सर्व नागरिकांना देशाबाहेर काढायची प्रक्रिया सुरू असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात वार्ताहरांशी बोलताना दिली. गृहविभागाच्या आकडेवारीनुसार राज्यातल्या एकंदर ४८ शहरांमध्ये ५ हजार २३ पाकिस्तानी नागरिक राहतात. या सर्व नागरिकांना आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्यापर्यंत देशातून बाहेर काढलं जाईल, असंही फडणवीस यांनी नमूद केलं.

**<><><><<>**

केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांचं आज छत्रपती संभाजीनगर शहरात आगमन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या सोबत आहेत.  शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कर्करोग रुग्णालयातील तसंच हेडगेवार रुग्णालयाच्या वैद्यकीय महाविद्यायातील विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत. एमआयटी

महाविद्यालयात मुख्यमंत्र्याच्या हस्ते सी.एम.आय.ए. उद्योग पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

<><><><<>

गडचिरोली जिल्ह्यातल्या कटेझरी गावात काल प्रथमच राज्य परिवहन मंडळाची बस पोहोचली. यावेळी स्थानिक नागरिकांनी ढोलताशांच्या निनादात आनंद व्यक्त केला.  उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे यांनी बसचं स्वागत केलं तर कटेझरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अजय भोसले यांनी बसला हिरवा झेंडा दाखवला.

धानोरा तालुक्यातलं अतिदुर्गम आणि आदिवासीबहुल हे गाव असून आजूबाजूच्या १० ते १२ गावातल्या नागरिकांना या बससेवेचा लाभ मिळणार आहे.

<><><><<>

आयपीएल टी-20 क्रिकेटमध्ये, मुंबईच्या वानखेडे मैदानावर आज मुंबई इंडियन्सची गाठ लखनौ सुपर जायंट्स संघाबरोबर पडणार आहे. साडेतीन वाजता खेळ सुरु होईल. लखनौ सुपर जायंट्स ने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.  दुसरा सामना संध्याकाळी दिल्लीत, दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यात होईल.

<><><><<>

महिला क्रिकेटमधे भारत, श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका या तिरंगी एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज श्रीलंकेत कोलंबो इथल्या प्रेमदासा स्टेडीयमवर होत आहे. चमारी अटापट्टूच्या नेतृत्त्वाखाली खेळणाऱ्या श्रीलंका संघाचा डाव ३८ षटकं आणि एका चेंडूत १४७ धावांवर आटोपला.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. विजयासाठी भारतासमोर १४८ धावांचं आव्हान आहे.

<><><><<>

नांदेड जिल्ह्याला काल सायंकाळी वादळी वारे आणि पावसाचा मोठा फटका बसला. मुखेड तालुक्यातल्या होंडाळा गावात ६५ वर्षांचा शेतकरी अंगावर वीज कोसळून मरण पावला. त्याचवेळी नायगाव तालुक्यात एक पाळीव बैल तर कंधार तालुक्यात ३ शेळ्यांचा मृत्यू वीज पडून झाला. या वादळी वारे आणि पावसाने उन्हाळी पिकांसह आंबा आणि इतर फळबागांचं तसंच काही कच्च्या घरांचंही नुकसान झालं .

<><><><>

विदर्भात आज वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागानं वर्तवली आहे.

//<><><><<>//